ePaper


# विधान परिषदेला खडसे, पाडवींचा गेम होणार!; जोरदार झटका देण्याची भाजपची तयारी



| वर्ष - 6 | अंक - 69 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- आमदार जगताप यांना भाजपाचा विजय समर्पित!
- पंकजा आमची मुलगीच, त्यांची काळजी घेण्यास भाजप समर्थ
- पांडुरंगापेक्षा PM मोदींचा फोटो मोठा!

www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 13 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"ईडीचा ताबा जणू काही दोन हजार रुपये उधार मागितल्याप्रमाणे मागितला जातोय असं म्हटलंय. "संजय राऊत दोन दिवसांसाठी ईडी मागतायत, जसं काही दोन हजार उधार मागतायत. अशी भीक मागायची पद्धत बरी नव्हे. हे सगळं कमवावं लागतं. राज्यसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवणारे शिवसेनेचे संजय पवार यांचा भाजपाचे धनंजय महाडिक यांनी पराभव केला आहे. त्यामुळे शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.

- **निलेश राणे,** भाजपाचे प्रदेश सचिव



"मी अजित पवार यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यसभा निवडणुकीत मतदान केले. शिवसेनेची भूमिका अशीच राहिल्यास भविष्यात तुमच्यासोबत राहायचे की नाही, याचा विचार करु, असा इशारा भुयार यांनी दिला होता. पण यानंतर त्यांनी यावर सारवासारव केली. मी भाजपसोबत जाणार नाही. उद्या संजय राऊत यांनी मतदान करु नका असे सांगितले तरी मी महाविकास आघाडीलाच मतदान करेन. कारण, मला भाजपची विचारसरणी पटत नाही.

- **देवेंद्र भुयार,** अपक्ष आमदार

## शॉर्ट न्यूज »

### संशयित शार्प शूटर संतोष जाधवला गुजरातमधून अटक

**| पुणे |** ग्रामीण पोलिसांनी पंजाबी गायक आणि काँग्रेस नेते सिद्धू मुसेवाला प्रकरणातील संशयित आरोपी संतोष जाधवला अटक केली आहे. गुजरातमधून पुणे ग्रामीण पोलिसांनी संतोषला ताब्यात घेतलं आहे. रविवारी रात्री उशीरा त्याला पुण्यातील जिन्हा न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आलं. त्याला २० जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणामध्ये पोलिसांनी जाधव टोळीतील अन्य एका गुन्हेगारालाही ताब्यात घेतलं आहे. मुसेवाला प्रकरणात पुणे पोलिसांनी आतापर्यंत अटक केलेल्यांची संख्या पाचवर पोहोचली आहे. मुसेवाला खून प्रकरणात पंजाब, राजस्थानमधील लॉरेन्स बिष्णोई टोळीचा हात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले होते.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दौऱ्यानंतरही राष्ट्रवादीची घरघर थांबेना..!

# अजित गव्हाणे यांचं मोठं अपयश, राष्ट्रवादीत दुफळी !

## 5 पदाधिकाऱ्यांनी 'फेकला' राजीनामा, आणखी 10 ते 15 जन बंडखोरीच्या तयारीत

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |**

पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नवनिर्वाचित पाच पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले असून, आणखी 10 ते 15 पदाधिकारी ही नाराज असून तेही राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत, अशी माहिती आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमधील नाराजी समोर आल्याने राष्ट्रवादी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचं हे मोठं अपयश मानलं जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहरात दौरा केला असतानाही राष्ट्रवादीतील अंतर्गत धुसफूस बंद झालेली नाही. त्यामुळे राष्ट्रवादीच्या गोटात सध्या अस्वस्थ वातावरण आहे.




फेब्रुवारी 2022 मध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष विशाल वाकडकर यांच्या पदावर इम्रान शेख यांना शहराध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्यावेळीच आधीच्या अनेक पदाधिकाऱ्यांमध्ये शेख यांच्या नियुक्तीवरून नाराजी असल्याची चर्चा होती. कारण, विशाल वाकडकर यांनी शहरातील सर्वात मजबूत अशी राष्ट्रवादी युवक काँग्रेसची फळी निर्माण केली. त्यातूनच अनेक युवा कार्यकर्ते त्यांनी घडविले. ज्यामधून येत्या महापालिका निवडणुकीत अनेकजण उमेदवार म्हणून इच्छुक आहेत. नव्या- जुण्यांचा मेळ घालण्यात शेख आणि गव्हाणे अपयशी ठरले असल्याचेही राष्ट्रवादीच्या गोटात बोलले जात आहे. त्याचे परिणाम नाराज वर्ग आणखी वाढत गेला आणि जाणीवपूर्वक कार्यक्षम कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना डावलण्यात आल्याची टीका होऊ लागली आहे. त्याचाच परिणाम म्हणून आज राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पिंपरी विधानसभा उपाध्यक्ष शुभम पंडित, राष्ट्रवादी युवक शहर उपाध्यक्ष वेदांत माळी, सचिव प्रशांत काळेल यासह अजून दोन अशा पाच पदाधिकाऱ्यांनी इम्रान शेख यांच्याकडे राजीनामे दिले आहेत.

### ऐन निवडणुकीच्या तोंडावर शहर राष्ट्रवादीला मोठा धक्का...

राष्ट्रवादी युवक काँग्रेस मधील पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याची माहिती समोर येण्याने हा ऐन निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादीला मोठा धक्का ठरू शकतो, अंतर्गत धुसफूस, पदांवरून नाराजी, राजीनामे ह्या गोष्टी राष्ट्रवादीसाठी धोकादायक तर भाजपसाठी फायदेशीर ठरू शकतील. अशा परिस्थितीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पक्षांतर्गत नाराजी व धुसफूस थांबविण्यासाठी काय शक्कल लढवितात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. यासंदर्भात शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्याशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दौऱ्यापूर्वी पुण्यात संशयित स्फोट

## 14 जूनला देहुतील संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदीराचे उद्धघाटन

**| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १४ जूनला देहुतील संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदीराचे उद्धघाटन होणार आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्याला दोनच दिवस बाकी असताना पुण्यामध्ये (Pune) भवानी पेठ मधील विशाल सोसायटीमध्ये एक संशयित स्फोट झाला आहे. या स्फोटामुळे पुणे शहरात खळबळ निर्माण झाली आहे. भवानी पेठेतील विशाल सोसायटी मधील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक 306 मध्ये हा संशयित स्फोट बझाला आहे. स्फोटाच्या तिव्रतेने फ्लॅट मधील खिडक्यांच्या काचा फुटल्या आहेत. फ्लॅटमध्ये झालेला स्फोट इतका भीषण होता की, या स्फोटाचा आवाज संपूर्ण सोसायटीमध्ये ऐकायला गेला. त्यानंतर सोसायटीतील रहिवाशांनी लागलीच



पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांनी (Pune Police) घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी राशद शेख या संशयित व्यक्तीला ताब्यात घेतल आहे. मागील दोन-तीन तासापासून पुणे पोलिस राषद शेख नावाच्या व्यक्तिकडे कसून चौकशी करत आहेत. राशद शेख कडे काही सिमकार्ड आणि पासपोर्ट सापडल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या घटनेची माहिती मिळताच पुणे पोलिसांसह बॉम्ब शोधक पथक घटनास्थळी दाखल झाले.

फ्लॅट धारक वॉशिंग मशीन, ओव्हन रीपेरींग चे काम करतो. पोलिसांनी शेख यांना ताब्यात घेतले असून फ्लॅट मधून काही सिम कार्ड आणि पासपोर्ट देखील जप्त केल्याची माहिती मिळत आहे. प्राथमिक माहितीनुसार हा स्फोट वॉशिंग मशीन रिपेअर करताना झाल्याचे समजत आहे.

राशद शेख हा गेल्या दहा वर्षापासून या सोसायटीत राहायला आहे. सध्या तो सोसायटीमध्ये एकटाच राहत असल्याची माहिती सोसायटीचे चेअरमन मुस्ताक अहमद यांनी दिली.

## शॉर्ट न्यूज »

### पुण्यात मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार ज्येष्ठाचा मृत्यू

**पुणे । महाईन्यूज ।**

भरधाव मोटारीच्या धडकेने दुचाकीस्वार ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना पुण्यातील पाषाण रस्त्यावर घडली. या प्रकरणी मोटार चालक महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला. अनिल जोशी (वय ७३, रा. बाणेर रस्ता, बालेवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे.

जोशी यांचा मुलगा योगेश (वय ४२) यांनी या संदर्भात चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी मोटार चालक पल्लवी गुप्ता (रा. बावधन) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुचाकीस्वार अनिल जोशी पाषाण रस्त्यावरुन जात होते. त्या वेळी एचईएमआरएल कंपनीसमोर भरधाव मोटारीने दुचाकीस्वार जोशी यांना धडक दिली. अपघातानंतर जोशी यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

### विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचे गौरवोद्गार

# आमदार जगताप यांना भाजपाचा विजय समर्पित!

### देवेंद्र फडणवीस : राज्यसभा निवडणुकीतील विजयानंतर प्रतिक्रिया

**।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी**

राज्यसभेच्या सहाव्या जागेसाठी निवडणूक लागली. त्यामध्ये भाजपाचा विजय झाला. मात्र हा विजय आमदार लक्ष्मण जगताप यांना समर्पित करतो. गंभीर आजारी असताना देखील जगताप मतदानासाठी हजर राहिले. त्यांचे मत मोलाचे ठरल्याचे गौरवोद्गार विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले. आमदार लक्ष्मण जगताप गंभीर आजाराने त्रस्त आहेत. मात्र तरी देखील राज्यसभा निवडणुकीसाठी जाण्याचा हट्ट धरत त्यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. त्यांचे हे मत मोलाचे ठरले असल्याचे फडणवीस म्हणाले आहेत. तसेच आम्हाला एक मत नसले तरी हरकत नव्हती, मात्र जगताप यांच्या तब्येतीची काळजी घेणे गरजेचे असल्याचे देखील फडणवीस यांनी कुटुंबियांना सांगितले होते. मात्र एवढ्या आजारात देखील मतदानाला जाण्याचा हट्ट आमदार जगताप यांनी धरला. त्यांनी मतदान केले.



**शरद पवार काय म्हणाले...**

राज्यसभेच्या निकालाने मला कोणताही धक्का बसला नाही. भारतीय जनता पक्षाला अपक्षांना आपल्या बाजूने वळविण्यात यश मिळाले. अपक्ष आमदारांना आपल्या बाजूने वळविण्यात देवेंद्र फडणवीस यशस्वी ठरले अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली. तसेच, महाविकास आघाडीच्या एकूण संख्येप्रमाणे मतदान झाले. तिन्ही पक्षातील एकही मत फुटले नाही. जी मतं फुटली ती अपक्षांची आहेत, असंही पवार म्हणाले.



# पुण्यातील ३,५०० गुंडांची झाडाझडती

### पिस्तुले, काडतुसांसह शस्त्रसाठा जप्त

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी**

शहरातील गुंडांची झाडाझडती घेण्यासाठी मध्यरात्री गुन्हे शाखा तसेच पोलीस ठाण्यांमधील पथकांनी विशेष मोहीम राबविली. या कारवाईत पोलिसांनी शहरातील साडेतीन हजार सराईत गुंडाची झाडाझडती घेतली. त्यापैकी ६८५ गुन्हेगार मूळ पत्त्यावर राहत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी दोन पिस्तुलांसह, काडतुसे, तलवारी, कोयते जप्त केले. चंदननगर भागातील एका हुक्का पार्लरवरही कारवाई करण्यात आली.

शहरातील वाढती गुन्हेगारी तसेच गुन्हेगारांना जरब बसविण्यासाठी पोलिसांकडून अचानक विशेष मोहीम (ऑल आऊट आणि कोबिंग ऑपरेशन) राबविण्यात येते. पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, सहआयुक्त संदीप कर्णिक, अतिरिक्त आयुक्त नामदेव चव्हाण, राजेंद्र डहाळे, उपायुक्त भाग्यश्री नवटके, प्रियंका नारनवरे, सागर पाटील, पौर्णिमा गायकवाड, रोहीदास पवार, वाहतूक शाखेचे उपायुक्त राहुल श्रीरामे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा तसेच स्थानिक पोलीस ठाण्याची पथके या मोहिमेत सहभागी झाली होती.

बेकायदा पिस्तुल बाळगल्या प्रकरणी पोलिसांच्या गुन्हे शाखेने तीन ठिकाणी कारवाई केली. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली. आरोपींकडून दोन पिस्तुलांसह चार काडतुसे, ७९ खराब काडतुसे असा मुद्देमाल जप्त केला. बेकायदा तलवार, कोयते बाळगल्या प्रकरणी २९ जणांना अटक करण्यात आली.

# काँग्रेसला लागली चिंता; उमेदवाराला मिळालेली अतिरिक्त मते नेमकी कोणाची!

**बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी**



राज्यसभेच्या निवडणुकीचा निकाल पहाटे ४ वाजता जाहिर झाला. त्यामध्ये भाजपचे तीन आणि महाविकास आघाडीचे तीन उमेदवार विजयी झाले. सहाव्या जागेवरुन सुरु असलेली लढाई भाजपने जिंकली. आघाडीची १० मते फुटल्यामुळे भाजपचा विजय सोपा झाला. आता ही फुटलेली मते आणि आघाडीच्या उमेदवारांना जादाची पडलेली मते कोणाची आहेत. याची आकडेमोड केली जात आहे.

काँग्रेस राष्ट्रवादी आणि शिवसेनेने) आपल्या उमेदवारांसाठी ४२ मतांचा कोठा ठेवला होता. मात्र, काँग्रेसचे उमेदवार इमरान प्रताप गढी यांना ४४ मते मिळाली तर राष्ट्रवादीच्या प्रफुल्ल पटेल यांना ४३ मते मिळाली. शिवसेनेचे एक मत बाद झाल्यामुळे संजय राऊत यांना ४१ मते मिळाली.

या विषयी बोलताना काँग्रेसचे नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, निकालाचे विश्लेषण आम्ही केलेले नाही. काँग्रेस पक्षाने ठरल्याप्रमाणे सर्व मतदान केले आहे. 42 मतांचा कोटा होता त्याप्रमाणे आम्ही काँग्रेसच्या उमेदवारांला मते दिली आहेत. दोन अतिरिक्त मते कशी पडली त्याची चौकशी आम्ही करत आहोत. चूक झाली किंवा रणनीतीत कसे कमी पडलो याचा शोध घेणार आहोत. एक दोन दिवसात आणखीन स्पष्ट होईल, असे चव्हाण यांनी सांगितले.

नेमके चुकले कुठे याचा अभ्यास करावा लागेल, असे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात म्हणाले. राज्यसभेचे आमचे चारही उमेदवार पहिल्या फेरीत निवडून यावेत अशी अपेक्षा होती. मात्र, चौथा उमेदवार कोणत्याही परिस्थितीत विजयी होने आवश्यक होता. परंतु का झाला नाही याचा अभ्यास करावा लागेल. यात पसंतीच मत असत गणित असत सुत्र असत याचा अभ्यास आम्हाला नक्कीच करावा लागेल, आमचे चुकले कुठे. परंतु एका पराजयाने काही होत नाही. आम्ही एकत्रित लढू आणि जिंकू, असा विश्वास थोरात यांनी व्यक्त केला.

# पंकजा आमची मुलगीच, त्यांची काळजी घेण्यास भाजप समर्थ

### मी सामना वाचत नाही, सामनाची दखल देखील मी घेत नाही, चंद्रकांतदादांचे राऊतांना प्रत्युतर

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

चंद्रकांत पाटील म्हणाले, "पंकजा मुंडे यांची काळजी करायला भाजपा समर्थ असून मी सामना वाचत नाही आणि सामनाची दखल देखील मी घेत नाही, भाजप हे पंकजा मुंडे यांची काळजी घेण्यासाठी समर्थ आहेत. पंकजा मुंडे या पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाच्या प्रत्येक नेत्याची मुलगी आहे. त्यामुळे त्यांची काळजी घ्यायला आम्ही समर्थ आहोत. बाकी कोणी त्यांची काळजी करण्याची गरज नाही,"

"गोपीनाथ मुंडे आणि शिवसेनेचे जवळचे संबंध होते. त्यामुळे पंकजा मुंडेंची आम्हाला चिंता वाटते, असा टोलाही संजय राऊतांनी भाजपला "सामना"तून लगावला आहे. विधान परिषद निवडणुकीत पंकजा मुंडे यांना भाजपने पुन्हा डावलले. देवेंद्र फडणवीस यांना महाराष्ट्रात स्वतःची फळी उभी करायची आहे व त्या फळीत जुन्या निष्ठावान भाजप पदाधिकाऱ्यांना स्थान दिसत नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी व अन्य पक्षांतून आलेल्यांची मोट बांधली. त्यांना राज्यसभेपासून विधान परिषदेपर्यंत उमेदवाऱ्या सहज मिळाल्या. सदाभाऊ खोत, पडळकर, लाड, बोंडे यांना उमेदवारी मिळते, पण खडसे यांना पक्ष सोडावा लागतो व मुंडे यांना अपमानित करून डावलले जाते, अशी टीका राऊतांनी भाजपवर केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येत्या 14 तारखेला देहू येथे येत आहेत, यानिमित्ताने नरेंद्र मोदींचा फोटो हा विठ्ठलापेक्षा मोठा असलेले फलक लावण्यात आले आहे. यावर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष रविकांत वरपे यांनी आक्षेप घेतला आहे. यावर विचारलेल्या प्रश्नावर चंद्रकांत पाटील म्हणाले, "कुठेतरी कार्यकर्ता उत्साहाने लावतो. एवढे मॉनिटर का केले जाते, माहिती नाही. राष्ट्रवादी काँग्रेसने बॅनर लावावे. त्यात विठ्ठलाचा फोटो मोठा लावावा आणि मोदींचा फोटो लहान लावावा किंवा लावू नये. संबंधित बॅनर हे पक्षाकडून लावण्यात आलेले नाहीत,"



**नरेंद्र मोदी 14 जून रोजी देहू दौऱ्यावर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ जून रोजी देहू दौऱ्यावर येणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते जगतगुरु संत तुकाराम महाराज मूर्ती, शिळा मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. दोन वर्षानंतर सोहळ्याचे आयोजनयेत्या २० जूनपासून संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यास सुरुवात होणार आहे. गेल्या दोन वर्षापासून करोनामुळे हा सोहळा स्थगित करण्यात आला होता. यंदाच्या वर्षी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्यामुळे हा सोहळा उत्साहात पार पडणार आहे.

### स्वागत पोस्टर्सवरून वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या

# पांडुरंगापेक्षा PM मोदींचा फोटो मोठा!

## भाजपच्या वरिष्ठांकडून वादग्रस्त बॅनर हटवण्याचे आदेश

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवार १४ जुन रोजी देहू नगरीत दाखल होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या स्वागतासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात अनेक छोटे बॅनर्स आणि होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत. भाजप आमदार महेश लांडगे यांचे समर्थक निलेश बोराटे यांनीही पंतप्रधान मोदी यांच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवडमधील मोशी इथल्या भारतमाता चौकात मोठे बॅनर लावले आहे. मात्र या बॅनरवर पंतप्रधान मोदींचा फोटो विठ्ठलाच्या फोटोपेक्षा मोठा असल्याचं दिसून येत आहे. यामुळे वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या असल्याचे म्हटले जात आहे.

**।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**




पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या (१४ जुन) रोजी देहू दौऱ्यावर येणार आहेत. या वेळी ते देहू इथल्या जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिराला भेट देणार असून तिथल्या शिळा मंदिराचं लोकार्पण करणार आहेत. मात्र त्यापूर्वीच पंतप्रधान मोदी यांचा दौरा भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांमुळे वादात सापडला आहे. मोदींच्या स्वागतासाठी लावलेले स्वागत पोस्टर्सवरुन वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या असल्याचे म्हटले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवार १४ जुन रोजी देहू नगरीत दाखल होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या स्वागतासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात अनेक छोटे बॅनर्स आणि होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत. भाजप आमदार महेश लांडगे यांचे समर्थक निलेश बोराटे यांनीही पंतप्रधान मोदी यांच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवडमधील मोशी इथल्या भारतमाता चौकात मोठे बॅनर लावले आहे. मात्र या बॅनरवर पंतप्रधान मोदींचा फोटो विठ्ठलाच्या फोटोपेक्षा मोठा असल्याचं दिसून येत आहे. यामुळे वारकऱ्यांच्या भावना दुखावल्या असल्याचे म्हटले जात आहे.

यावरुनच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष रविकांत वरपे यांनी टीका करत वारकरी सांप्रदायाचा अवमान केल्याची भावना व्यक्त केली आहे. आपल्या ट्रीटमध्ये वरपे म्हणतात, "संत ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचून संत तुकाराम महाराजांनी यावर कळस चढविला.पिं-चिंचवड येथे भाजपाने जाणीवपूर्वक मोदींचा फोटो पांडुरंगापेक्षा जाणीवपूर्वक मोठा दाखवून संप्रदायाचा अवमान केला आहे. विटेवरी उभा बा विठ्ठलापेक्षा मोठा कोणी नाही. पिंपरी चिंचवड शहर भाजपाने मोदींना विठ्ठलापेक्षाही मोठे दाखवण्याचे पाप केले आहे. वारकरी संप्रदायाची बदनामी वारकरी संप्रदाय खपवून घेणार नाही. याबद्दल भाजपाने पांडुरंगापुढे लोटांगण घालून माफी मागावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान आज सकाळपासून माध्यमांमध्ये याबद्दलच्या बातम्या झळकल्यानंतर भाजपच्या वरिष्ठांनीही या वादग्रस्त बॅनर्सची दखल घेतली आहे.

---

# "भाऊ, तुमच्यामुळे मी परत खासदार झालो !

## धनंजय महाडीकांनी मानले जगतापांचे आभार

**।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**



राज्यसभा निवडणुकीत महाराष्ट्रात प्रतिष्ठेची केलेली सहावी जागा जिंकून भाजपने महाविकास आघाडीला काल धक्का दिला.संख्याबळानुसार निवडून येऊ न शकणारी ही जागा त्यांनी निवडून आणली.

कोल्हापूरचे धनंजय महाडिक विजयी झाले. त्यासाठी जीवघेण्या आजाराशी सामना करीत असलेले चिंचवडचे पक्षाचे आमदार लक्ष्मण जगताप आणि कसबापेठच्या आमदार मुक्ता टिळक या दोघांनी रुग्णवाहिकेतून मुंबईतला जाऊन मतदान केले होते. म्हणून हा विजय या दोन आमदारांना राज्यातील भाजपचे सर्वोच्च नेते देवेंद्र फडणवीस यांनी कालच समर्पित केला. त्यानंतर लगेच काल रात्रीच नवनिर्वाचित खासदार महाडिकांनी आमदार जगतापांच्या पिंपरी-चिंचवडमधील (पिंपळे गुरव) निवासस्थानी भेट देऊन त्यांचे आभार मानले.

लक्ष्मणभाऊंमुळे दुसऱ्यांदा खासदार होण्याचा माझा मार्ग सुकर झाला, अशी प्रांजळ भावना महाडीक यांनी या भेटीत दिली. "भाऊ, तुमच्यामुळे मी पुन्हा एकदा खासदार होऊ शकलो. तुमची पक्षनिष्ठा, लढवय्येपणा आणि प्रबळ इच्छाशक्ती भाजपच नाही तर सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना कायम प्रेरणा देणारी आहे", अशा शब्दांत त्यांनी जगतापांचे आभार मानले.

"तुम्हाला उत्तम आरोग्य लाभो, पिंपरी-चिंचवडमधील जनतेच्या सेवेसाठी तुम्ही लवकरात लवकर पुन्हा नव्या जोमाने काम सुरू कराल," अशी प्रार्थना त्यांनी केली. पिंपरी-चिंचवड पालिकेवर पुन्हा एकदा भाजपचा भगवा फडकवायचा आहे. त्यासाठी सर्व प्रकारची मदत मी करणार असल्याचा शब्द महाडीक यांनी यावेळी जगताप यांना दिला. जगतापांचे बंधू, माजी नगरसेवक व भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, विजय जगताप व कुटुंबातील सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. मुंबईत विजयाचा जल्लोष केल्यानंतर महाडीक शनिवारी रात्री थेट पिंपळेगुरवमध्ये आले. त्यांनी जगतापांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी त्यांचे जगताप कुटुंबियांच्या वतीने औक्षण करून अभिनंदन करण्यात आले.

विधानसभेतील आमदारांमधून राज्यसेभेवर निवडून द्यावयाच्या ६ जागांसाठी शुक्रवारी मतदान झाले. निवडणूक रिंगणात ७ उमेदवार उतरल्याने चुरस होती. राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीचे चार, तर भाजपचे तीन उमेदवार रिंगणात होते. त्यात शिवसेनेचे संजय पवार आणि भाजपचे धनंजय महाडीक यांच्यात सहाव्या जागेसाठी लढाई झाली. त्यात भाजपचे धनंजय महाडीक विजयी झाले.

पक्षाने या विजयाचे संपूर्ण श्रेय आमदार जगतापांना दिले. ते गेले दोन महिने आजारी आहेत. त्यांना नुकतेच रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. अजूनही त्यांना तब्येतीची काळजी घेण्याची गरज आहे. मात्र, राज्यसभा निवडणुकीसाठी पक्षाला एका-एका मताची असलेली गरज ओळखून त्यांनी घर ते मुंबई असा ॲम्ब्युलन्समधून प्रवास करत या निवडणुकीत मतदान केले. त्यांची ही पक्षनिष्ठा आणि दुर्दम्य इच्छाशक्ती पाहून फडणवीस आणि राज्यातील संपूर्ण भाजप भारावून गेली. कारण त्यांच्या मतदानामुळे महाडीकांचा विजय सोपा झाला.

> लक्ष्मणभाऊंमुळे दुसऱ्यांदा खासदार होण्याचा माझा मार्ग सुकर झाला, अशी प्रांजळ भावना महाडीक यांनी या भेटीत दिली. "भाऊ, तुमच्यामुळे मी पुन्हा एकदा खासदार होऊ शकलो. तुमची पक्षनिष्ठा, लढवय्येपणा आणि प्रबळ इच्छाशक्ती भाजपच नाही तर सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना कायम प्रेरणा देणारी आहे", अशा शब्दांत त्यांनी जगतापांचे आभार मानले.

---

# देहूतील तुकोबांचे मंदिर भाविकांसाठी राहणार खुले; केवळ १४ जूनला बंद!

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



देहूतील संत तुकाराम महाराजांचे मंदिर दर्शनासाठी भाविकांना बंद ठेवण्याचा निर्णय संस्थानने मागे घेतला आहे. केवळ कार्यक्रमादिवशी म्हणजे १४ जूनला सायंकाळी पाचपर्यंत मंदिरात भाविकांना बंदी असणार आहे, अशी माहिती देहू संस्थानचे अध्यक्ष नितीन महाराज मोरे यांनी दिली आहे. शनिवारी देहूतील तुकोबांचे मंदिर भाविकांसाठी तीन दिवस बंद ठेवण्यात येणार असल्याचे विश्वस्त माणिक महाराज मोरे यांनी सांगितलं होतं. परंतु, या निर्णयानंतर समाजमाध्यमांवर आलेल्या प्रतिक्रिया आणि भाविकांची होणारी गैरसोय यामुळे हा निर्णय बदलण्यात आला असल्याची माहिती नितीन महाराज मोरे यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १४ जूनला शिळा मंदिर आणि तुकोबांच्या मूर्तीचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीने देहू संस्थान ने मंदिर तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, तो निर्णय आता बदलण्यात आला आहे. याविषयी देहू संस्थान चे अध्यक्ष नितीन महाराज मोरे म्हणाले की, मंदिर परिसर स्वच्छ करून घेण्यात येत आहे.

राज्यभरातून तुकोबांच्या दर्शनासाठी भाविक येत असतात त्यामुळं त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येकी दोन तासांनी दर्शन थांबविण्यात येणार आहे. परंतु, त्या वेळेत आलेल्या भाविकांना स्क्रिनच्या माध्यमातून मुखदर्शन घेता येईल याची सोय केली आहे. दोन दिवस संस्थानला सहकार्य करून स्क्रिनवरून दर्शन घ्यावं, अशी विनंती त्यांनी केली. केंद्रीय यंत्रणा यांनी अस म्हटलं नाही, की मंदिर बंद ठेवा. पंतप्रधानांच्या सुरक्षेबाबत काळजी घेणं गरजेचं आहे. त्यामुळं तीन दिवस मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. आता तो मागे घेण्यात आला आहे.

## संपादकीय »

# इस्लामिक देशांचा रोष आणि देशाची नाचक्की

***पैगंबर मोहम्मद यांच्यावरील वादग्रस्त विधानाप्रकरणी भाजपच्या प्रवक्त्या नूपुर शर्मा आणि नवीन कुमार जिंदल यांना भाजपने निलंबित केले आहे. शर्मा यांच्या वादग्रस्त विधानाचे इस्लामी देशांमध्ये तीव्र पडसाद उमटले. पाकिस्तानसह ओआयसी या इस्लामी देशांच्या संघटनेनेही भारतावर कडाडून टीका केली. तसेच आखाती देशांनी भारतीय वस्तूंवर बहीष्कार टाकण्याचीही मागणी केली आहे. कुवेतमध्ये भारतीय उत्पादन रस्त्यावर फेकली जात आहेत. इस्लामिक देशांनी घेतलेलया या आक्रमक भूमिकेचा भारताला आर्थिकदृष्ट्या फटका पडणार आहे.***

यामुळे नाईलाजाने का असेना भाजपने लगेच नाही पण उशीरा का होईना एक पाऊल मागे जात या इस्लामिक देशांच्या दबावापुढे नमते घेत काही महत्वाचे निर्णय घेतले. यामागे अनेक राजकीय कारणे जरी असली तरी या अरब देशांशी भारताचे असलेले व्यापारी संबंध हे देखील महत्वाचे कारण आहे.

शर्मा यांच्या विधानामुळे कतार, कुवेत, इराण यांनतर सौदी अरेबिया, बहारीन, अफगाणिस्तान, संयुक्त अरब आमिराती, मालदीव, जॉर्डन यांच्यामागोमाग पाकिस्ताननेही शर्मा यांच्या वक्तव्याचा निषेध केला. शर्मा यांचे विधान मुस्लिमांच्या भावनांना ठेच पोहचवणारे , चिथावणीखोर असल्याचा या सर्वच देशांनी आरोप केला . तर काही देशांनी नुसता निषेध व्यक्त न करता भारताने जाहीर माफी मागावी अशी मागणीही केली. परिस्थिती चिघळत असल्याबरोबरच आंतरराष्ट्रीयस्तरावर भारताची विशेषतं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा मलिन होत असल्याने भाजपने सावरासावर करत शर्मा आणि जिंदल यांना पक्षातून बाहेरचा रस्ता दाखवला. यामुळे मोदींनी केलेल्या कारवाईमुळे बहारिनसह अनेक देशांनी त्यांचे कौतुक केले. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या वादावर तूर्तास तरी पडदा पडल्याचे चित्र दिसत आहे. मात्र नेहमी धर्म आणि पक्षातील प्रत्येक नेत्याच्या मागे ठामपणे उभे राहणाऱ्या भाजपने यावेळी पक्षातील वाचाळवीरांना पक्षातूनच बाहेर काढल्याने पुढच्याला ठेच मागचा शहाणा हा बोध भाजप नेत्यांनी यातून घेणे अपेक्षित आहे. पण जर हीच तत्परता भाजपने आक्षेपार्ह विधान करणाऱ्या वाचाळवीर नेत्यांवर वेळीच कारवाई करत दाखवली असती तर आज जगभरात मोदींचीच नाही तर देशाचीही झालेली नाचक्की टाळता आली असती.

आखाती देशांबरोबर भारताचे नेहमीच स्नेहपूर्वक संबंध राहीले आहेत.



## आनंदी सकाळ

# 'मातृदेवो भव'

पवित्रता ज्या त्यागाहून सहनशीलतेतून प्रकट होते, हे सर्वशील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत. म्हणून भारतीय सौंदर्यबोधही अशा उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे; कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे. नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्याचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे. पुत्र हा कुपुत्र होऊ शकतो; परंतु माता ही कधीच कुमाता होत नाही, असा दृढ विश्वास 'आई' या दोन अक्षरांत आहे. नारदाने भक्तीच्या एकादश आसक्तीत वात्सल्याचा अंतर्भाव केला आहे. संतांनी ईश्वरास, सद्गुरूस माऊली भावाने हाक मारली. 'मातृदेवो भव' ही सार्वकालिक आस्था आहे. भारतीयांनी याच मनोभूमिकेत मातृभूमीस 'आई'च्या उदात्त भावनेने स्वीकारले; त्यामुळे भारतीय अध्यात्म हे सतत सर्वोदय व राष्ट्रोद्धाराशी एकरूप आहे.

# आत्मनिर्भर भारतातील स्टार्टअपचे जग...




दरवर्षी अनेक स्टार्टअप सुरू होतात, परंतु त्याची वाढ होणे आवश्यक आहे. वाढ झाली नाही किंवा वाढीचा वेग दिसत नसेल तर गुंतवणूकदार मिळणार नाहीत. अनुभवी गुंतवणूकदार लगेच ओळखतात की, एखादा स्टार्टअप वाढीचा काळ काय असू शकेल. स्टार्टअपच्या वाढीसाठी पुढील काही गोष्टी महत्वाच्या असतात. भविष्याचे योग्य नियोजन, प्रगतीला आवश्यक असणारी संघटना बांधणी त्यात तज्ज्ञांचा समावेश असणे, ग्राहक संपर्क, ग्राहक प्रतिक्रिया विश्लेषण, नवनिर्माण व सततचे इनोव्हेशन, उत्पादन किंवा सेवेत सतत मूल्यवर्धी, लवचिक धोरणे व त्वरित कृती, नियोजनात व भविष्याचा वेध घेण्यात सर्वात पुढे असणे, समाज, भागीदार, कर्मचारी संबंध महत्वाचे असतात.




स्टार्टअप ही संकल्पना सध्या फारच नावाजली गेली आहे. विशेषत: तरुण उद्योजकांमध्ये ही संकल्पना फार आवडती होत चालली आहे, परंतु स्टार्टबद्दल अनेक गैरसमजसुद्धा आहेत. अनेकांना त्याची व्यवस्थित माहिती नाही. ही माहिती असणे फार गरजेचे आहे, स्टार्टअप म्हणजे काय हेसुद्धा बऱ्याच नवउद्योजकांना माहीत नाही. कुठलाही नवीन बिझनेस सुरू करायचा तर त्याला स्टार्ट म्हणायचं का, हासुद्धा एक महत्वाचा प्रश्न नवीन उद्योजकांसमोर असतो. स्टार्टअपसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनासुद्धा आहेत.


दादासाहेब फाळके यांच्या जीवनावरील 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' हा चित्रपट प्रत्येक उद्योजकांनी बघावा असे मी सुचवितो. 'दि लाइफ ऑफ ख्रिस्त' हा इंग्रजी चित्रपट दादासाहेब फाळके यांनी 1910 च्या ख्रिसमसच्या आदल्या दिवशी बघितला आणि त्या पिक्चरच्या प्रेरणेमधून दादासाहेब फाळके यांनी चित्रपट उद्योगाची मुहूर्तमेढ भारतात रोवली. दादासाहेबांना पेंटिंग, प्रिंटिंग, फोटोग्राफी इत्यादी कला अवगत होत्या. भारतीय पौराणिक चित्रपट बनवण्याच्या ध्यासाने दादासाहेबांना झपाटून टाकलं होतं. त्यांच्या सर्व मित्रांनी त्यांना वेड्यात काढले, पण दादासाहेब आपल्या स्वप्नावर ठाम होते.

दादासाहेबांनी चित्रपट निर्मिती या विषयावरील जे काही साहित्य मिळेल ते सर्व वाचले त्याचा अभ्यास केला एवढेच नव्हे तर त्यांनी त्या काळात 75 रुपयात एक कॅमेरा विकत घेतला आणि त्याचं तंत्र शिकायला त्यांनी सुरुवात केली. त्याकाळी ही रक्कम किती मोठी होती याच उदाहरणच सांगायचं तर तेव्हा सोन्याचा भाव 18 रुपये तोळा होता, त्याकाळचे 75 रुपये म्हणजे खूप मोठी रक्कम होती. प्रकरण इथेच थांबले नाही तर घरातील वस्तू गहाण ठेवून त्यांनी चित्रपट निर्मितीचे प्रशिक्षण घेण्यासाठी परत इंग्लंड गाठलं आणि इंग्लंडमधील एका प्रसिद्ध फिल्म स्टुडिओत त्यांनी दोन महिने प्रशिक्षण घेतले. दोन महिन्यानंतर ते भारतात परत आले, तो भारतीय चित्रपट काढण्याच्या ध्यासानं. येताना ते कॅमेरा, डेव्हलपिंग व प्रिंटिंगची काही दिवस पुरेल इतकी सामुग्री चित्रपटावर अनेक पुस्तकं व मासिकं घेऊन आले.

# सांग सांग भोलानाथ... पाऊस पडेल का....

**स्कायमेट या खासगी हवामान अभ्यासक आणि अंदाजक कंपनीने केंद्र सरकारच्या हवामान खात्यावर टीका केल्यामुळे एक नवेच वादळ भिरभिरू लागले आहे.**

स्कायमेट या खासगी हवामान अभ्यासक आणि अंदाजक कंपनीने केंद्र सरकारच्या हवामान खात्यावर टीका केल्यामुळे एक नवेच वादळ भिरभिरू लागले आहे. एके काळी आकाशवाणी आणि दूरदर्शनप्रमाणे हवामान खात्याचीही मक्तेदारी होती. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात आकाशवाणी आणि दूरदर्शनची मक्तेदारी संपली आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्याच दशकात हवामान खात्यास स्पर्धक मिळाला. खासगी वृत्तवाहिनीवर वार्तापत्राच्या अखेरीस हवामान अंदाज वर्तवण्याचे काम करणाऱ्या जतीन सिंग या तरुणाने १९ वर्षांपूर्वी 'स्कायमेट' ही कंपनी स्थापन केली आणि सरकारी हवामान खात्यावर आळस झटकण्याची वेळ आली. आज गोदरेजसारख्या कंपनीने केलेली सणसणीत गुंतवणूक आणि देशी-परदेशी वृत्तमाध्यमे, टाटा आदी ऊर्जा



कंपन्यांसारखे ग्राहक यांमुळे स्कायमेट या क्षेत्रात चांगलीच स्थिरावली असून यामुळे सरकारी हवामान खात्यास आव्हान निर्माण झाले आहे. हवाई दलातील निवृत्त कर्मचारी, संगणकतज्ज्ञ अशा अनेकांस सेवेत सामावून घेण्याची व्यावसायिकता दाखवल्याने स्कायमेटच्या हवामान-भाकितांची अलीकडे अधिक चर्चा होताना दिसते. यातून निर्माण झालेल्या आत्मविश्वासामुळे असेल पण स्कायमेटने थेट सरकारी हवामान खात्याच्या ताज्या हवामान भाकितावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. या प्रश्नांत तथ्य आहे असे अनेकांस वाटते. या दोघांत खरे-खोटे वा चूक-बरोबर कोण हे अवघ्या काही दिवसांत स्पष्ट होईल. पण यानिमित्ताने स्कायमेटने निर्माण केलेले प्रश्न दखलपात्र ठरतात.

कारण सरकारी हवामान खात्याने मोसमी पावसाच्या भाकितासाठी स्वत:च घालून दिलेल्या निकषांचे पालन केलेले नाही, असे स्कायमेटचे म्हणणे असून ते त्यांनी सप्रमाण मांडले आहे. मुद्दा आहे मोसमी पावसाचे आगमन केरळात झाले आहे किंवा नाही, हा. यंदा पावसाळा चांगला असेल, तो नेहमीपेक्षा लवकर येईल असे प्रतिपादन सरकारी हवामान खात्याने आधीच केले. त्यामुळे आपले प्रतिपादन रास्त आहे हे दाखवून देण्याच्या नादात यंदा मोसमी पाऊस तीन दिवस आधीच केरळात धडकल्याचे हवामान खात्याने जाहीर केले. स्कायमेटचा नेमका आक्षेप याच मुद्द्यावर आहे. असे पावसाचे आगमन जाहीर करण्यापूर्वी काही ठरावीक निकषांची पूर्तता झाल्याची खात्री करावी लागते.

## ।। अभंगवाणी ।।



सासुरियां वीट आला भरतारा ।
इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥
सांडवर कोणी न धरिती हातीं ।
प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी संजय राठोडांना क्लिनचिट?



।बीड ।महाईन्यूज ।

पूजा चव्हाण मृत्यू प्रकरणात सर्व बाजूने तपास करण्यात आला. या तपासात तिची हत्या झाले नसल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी अकस्मात मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. टीकटॉक स्टार पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी शिवसेना नेते संजय राठोड यांना क्लिनचिट मिळण्याची शक्यता आहे. पूजा चव्हाण हिचा मृत्यू हत्येमुळे झाला नसून अकस्मात असल्याचं स्पष्ट झालं आहे. पुणे पोलिसांच्या समरी अहवालात हे स्पष्ट झालं आहे. पूजा चव्हाण मृत्यू प्रकरणात सर्व बाजूने तपास करण्यात आला. या तपासात तिची हत्या झाले नसल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी अकस्मात मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे.या मृत्यूप्रकरणी अहवाल २१ एप्रिल २०२२ रोजी गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आला होता, असं पोलीस उपायुक्त नम्रता पाटील म्हणाल्या.

### धनंजय महाडिक राज्यसभेच्या निवडणुकीत विजयी

# देवेंद्र फडणवीसांमुळे विजय सुखकर झाला

### आठ वर्षांनी गुलाल लागताच धनंजय महाडिकांची प्रतिक्रिया

।कोल्हापूर ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यसभेच्या निवडणुकीत विजयी झालेले नवनिर्वाचित खासदार धनंजय महाडिक यांचे माजी आमदार महादेवराव महाडिक यांच्या शिरोली येथील निवासस्थानी जल्लोषी स्वागत करण्यात आले. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे विजय सुखकर झाला, अशी प्रतिक्रिया खासदार धनंजय महाडिक यांनी दिली आहे.

दरम्यान, राज्यसभा निवडणुकीतील विजयानंतर धनंजय महाडिक आज कोल्हापुरात दाखल झाले. त्यावेळी त्यांनी कुटुंबिय, भाजप कार्यकर्ते आणि समर्थकांकडून महाडिकांचं जंगी स्वागत करण्यात आलं. ढोल-ताशांचा गजर आणि गुलालाची उधळण करण्यात आली. पुण्याहून कोल्हापूरच्या दिशेने निघताना कराडमध्ये रस्त्यात माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासोबत महाडिकांची भेट झाली. त्यावेळी राजू शेट्टींनी त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



#### ...या जन्मात तरी उतराई होणार नाही

भाजपने दिलेल्या संधीची या जन्मात तरी उतराई होणार नाही, यासाठी भारतीय जनता पक्षाचे आभार मानतो. तसेच संपूर्ण महाडिक कुटुंब स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची सत्ता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

#### राज्यसभेची उमेदवारी मिळणे खूप कठीण काम

राज्यसभेची उमेदवारी मिळणे खूप कठीण काम आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आमचे नेते आदरणीय महादेवराव महाडिक यांच्या नेतृत्वाखाली गेली ३५ वर्षे महाडिक परिवार राजकारणामध्ये समाजकारणात कार्यरत आहे. आमचे सर्व कुटुंब, युवक असतील किंवा आमचे साहेबांचे सर्व बंधू असतील त्यांनी जे वलय चार जिल्ह्यांमध्ये निर्माण केलं आहे, त्यामुळे कुठेतरी भारतीय जनता पार्टीने दखल घेतली असे म्हणावे लागेल. तसेच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला उमेदवारीची संधी दिली. परंतु देवेंद्र फडणवीसांमुळे विजय सुखकर झाला, असं महाडिक म्हणाले.

#### देवेंद्र फडणवीसांमुळे विजय सुखकर झाला

आठ वर्षांनी गुलाल लागताच धनंजय महाडिकांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी महाडिक म्हणाले की, ही निवडणूक इतकी सोपी नव्हती, परंतु देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे विजय सुखकर झाला असे म्हणावे लागेल. कारण ज्यावेळी उमेदवारी जाहीर झाली. त्यावेळी आमच्याकडे २७२ आमदारांची संख्या असल्याचे महाविकास आघाडीच्या वतीने घोषित करण्यात आले होते, त्यामुळे त्यांचे उमेदवार संजय पवार हे सहज निवडून येतील, अशी घोषणा त्यांनी केली होती. त्यामुळे दहा ते बारा दिवसांमध्ये भाजपची सर्व टीम कार्यरत झाली आणि निकाल आमच्या बाजूने लागला, असं धनंजय महाडिक म्हणाले.

---

## रेल्वेत मुंबईच्या ४४८ उमेदवारांच्या नोकरीचा मार्ग मोकळा

### केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवेंचा पाठपुरावा

।मुंबई ।महाईन्यूज ।

११ जून २०२२ रोजी रेल्वे मध्ये CEN 01/2018 असिस्टंट लोको पायलट भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती, त्यात मुंबई RRB च्या पात्र वेटलिस्टवरील उमेदवारांना डावलून गोरखपूरच्या RRB च्या उमेदवारांना RRB मुंबईच्या अधिकार क्षेत्रात संधी देण्यात आली, यामुळे महाराष्ट्रातील विशेषतः मुंबईतील वेटलिस्टवर असलेल्या उमेदवारांची संधी हुकली होती. ही बाब केंद्रीय रेल्वे, कोळसा व खाण राज्यमंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तात्काळ रेल्वे बोर्डाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या त्यामुळे मुंबईतील रिक्त जागांची गरज मागवून मुंबईच्या वेटलिस्ट उमेदवारांना संधी दिली जाणार



आहे. याविषयी नोटीफिकेशन काढले असून त्यामुळे मुंबईच्या उमेदवारांना संधी दिली जाणार आहे तसेच भारतातील RRB चे एकूण 7400 उमेदवारांचे काम मार्गी लागणार आहे. रेल्वे बोर्ड कडून RRB मार्फत गरजेनुसार लोको पायलट ची परिक्षा घेतली जाते. त्यानुसार मेन पॅनल व वेटींग लिस्ट ची नावे जाहिर करण्यात येतात.केंद्रीय रेल्वे, कोळसा व खाण राज्यमंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे यांनी महाराष्ट्रातील या उमेदवारांवर होणारा अन्याय होऊ दिला नाही.

### विधानपरिषदेला ताकही फुंकून पिण्याची व्यक्त केली आवश्यकता

# गाफील राहिल्याने पराभव झाला

### राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांचे राज्यसभा निवडणुकीवर मत

।अंबरनाथ ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यसभा निवडणुकीत गाफील राहून पराभव झाला. त्यामुळे आता विधान परिषदेला ताकही फुंकून प्यावे लागेल असे परखड मत राष्ट्रवादीचे नेते आणि विधान परिषदेचे उमेदवार एकनाथ खडसे यांनी व्यक्त केले आहे. रविवारी अंबरनाथमध्ये एका खासगी कार्यक्रमासाठी उपस्थित असताना त्यांनी हे वक्तव्य केले.

राज्यसभेच्या निवडणुकीनंतर महाविकास आघाडीच्या विविध सहयोगी पक्षांकडून पराभवानंतर मत व्यक्त केली जात आहेत. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या यशस्वी रणनितीवर बोलत असतानाच महाविकास आघाडीचे



नियोजन कुठे चुकले याबाबतही उघड प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. येत्या विधान परिषद निवडणुकीत याची खबरदारी घेण्याबाबतही मत व्यक्त केली जात असतानाच विधान परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार एकनाथ खडसे यांनीही यावर परखड मत व्यक्त केले आहे. अंबरनाथ येथे एका खासगी कार्यक्रमानिमित्त आले असता त्यांनी माध्यमांशी बोलताना हे मत व्यक्त केले. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये आम्ही बरेच काही शिकलो. जो अतिआत्मविश्वास होता त्यामुळे काही गोष्टींकडे दुर्लक्ष झाले. त्याकडे आता दुर्लक्ष होता कामा नये, ही शिकवण यावेळी मिळाल्याचे खडसे यांनी कबूल केले. मात्र पराभव हा पराभव असतो. तो शिवसेनेचा असला तरी तो महाविकास आघाडीचा पराभव आहे. हा पराभव जिव्हारी लागल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. येत्या विधान परिषद निवडणुकीत यापासून धडा घेत ताकही फुंकून पिण्याची गरज असून त्यानुसार निवडणुकीची तयारी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विधानपरिषदेची तयारी करत असताना प्रत्येक गोष्ट तपासून आणि विश्वासाने करण्याची आवश्यकता आहे, असेही खडसे म्हणाले.

▸▸ राज्यसभेच्या निवडणुकीनंतर महाविकास आघाडीच्या विविध सहयोगी पक्षांकडून पराभवानंतर मत व्यक्त केली जात आहेत. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या यशस्वी रणनितीवर बोलत असतानाच महाविकास आघाडीचे नियोजन कुठे चुकले याबाबतही उघड प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. येत्या विधान परिषद निवडणुकीत याची खबरदारी घेण्याबाबतही मत व्यक्त केली जात असतानाच विधान परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार एकनाथ खडसे यांनीही यावर परखड मत व्यक्त केले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### सोनिया गांधींची प्रकृती खालावली, उपचारासाठी रुग्णालयात केले दाखल

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

सोनिया गांधी यांची प्रकृती खालावली असल्याने त्यांना नवी दिल्लीतील गंगाराम रुग्णालयातमध्ये सोनिया गांधी यांना पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गेल्या आठवड्यातच त्यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यानंतर



त्यांच्यावर घरीच उपचार सुरु होते. 1 जून रोजी संध्याकाळी सोनिया गांधी यांना ताप आला होता. तापाची हलकी लक्षणे समोर आल्यानंतर त्यांची कोरोना चाचणी करण्यात आली. ही चाचणी पॉझिटिव्ह आल्यानंतर सोनिया गांधी यांना कोरोनाची लागण झाली असल्याचं स्पष्ट झाले होते.

कोरोनामुळेच त्यांची प्रकृती खालावली आहे. त्या नंतर पुढील उपचारासाठी त्यांना आता रुग्णालयात

# राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी भाजपकडून मोर्चेबांधणीला सुरुवात

## जेपी नड्डा आणि राजनाथ सिंह यांच्यावर मोठी जबाबदारी

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारतीय निवडणूक आयोगाने राष्ट्रपती निवडणुकीची ताहीर जाहीर केली आहे. देशाला लवकरच नवे राष्ट्रपती मिळणार आहेत. १८ जुलैला यासाठी मतदान होणार असून २१ जुलै रोजी निकाल लागणार आहे. यासंदर्भातील सर्व माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली आहे. परंतु आता आगामी महिन्यात होणाऱ्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी भाजपकडून मोर्चेबांधणी सुरू आहे. भाजपने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे.भाजपने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यावर आज राष्ट्रपती पदाच्या निवडणूकबाबत मोठी जबाबदारी दिली आहे. राष्ट्रपती पदाचा उमेदवार निवडण्यासाठी भाजप एनडीएमधील मित्रपक्षांसोबत चर्चा करणार असल्याचं सांगितलं



जात आहे. एनडीएचे मित्रपक्ष, अपक्ष आणि युपीएच्या मित्रपक्षांसोबत चर्चा करण्याची जबाबदारी जेपी नड्डा आणि राजनाथ सिंह यांच्यावर सोपवली आहे.देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा कार्यकाळ २४ जुलै २०२२ रोजी संपत आहे. त्याआधीच देशाच्या १५ व्या राष्ट्रपतींची निवड होणार आहे. १७ जुलै २०१७ रोजी राष्ट्रपतीपदाच्या निवडणुका झाल्या. मात्र, आता राष्ट्रपतींचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपत असून जनतेने निवडून दिलेले देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा

> ⏭ देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा कार्यकाळ २४ जुलै २०२२ रोजी संपत आहे. त्याआधीच देशाच्या १५ व्या राष्ट्रपतींची निवड होणार आहे.

कार्यकाळ २४ जुलै २०२२ रोजी संपत आहे. त्याआधीच देशाच्या १५ व्या राष्ट्रपतींची निवड होणार आहे. प्रतिनिधी आणि वरच्या सभागृहातील लोकप्रतिनिधी मतदान करणार आहेत. मागच्या निवडणुकीत ५० टक्के मतदान एनडीएचे उमेदवार रामनाथ कोविंद यांच्या बाजूने झाले होते.



# पुलवामामध्ये झालेल्या चकमकीत तीन अतिरेक्यांचा खात्मा

## अतिरेक्यांकडून मोठा शस्त्रसाठा जप्त

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

जम्मू काश्मिरमध्ये झालेल्या चकमकीत तीन अतिरेक्यांना सुरक्षा बलाच्या जावानांनी ठार केले. सुरक्षा दलाचे जवान आणि अतिरेक्यांमध्ये ही चकमक पुलवामा येथे झाली. अतिरेक्यांकडून मोठा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. यात दोन एके 47 रायफल, एक पिस्तूल आणि मोठ्या संख्येने दारुगोळ्या जप्त करण्यात आला आहे. जवानांकडून चकमक झालेल्या भागाचे सर्च ऑपरेशन सुरु करण्यात आले आहे. या चकमकीत ठार झालेल्या अतिरेक्यांची नावे इरफान मलिक, फजिल नजीर भट्ट, जुनैद कादिर असून ते लष्कर-ए- तोयबा अतिरेकी संघटनेचे सदस्य होते. माहिती समोर आली होती. यानंतर अतिरेख्यांची पोझिशन आणि त्यांच्या सोबत असलेल्या हत्यारांची माहिती पोलिसांना मिळाली होती.

> **सर्व अतिरेकी स्थानिक**
>
> खात्मा करण्यात आलेले सर्व अतिरेकी स्थानिक होते. इरफानचे वय 25 होते. तो पुलवामाच्या हरिपोरा येथील होता. फाजिल नजीर भट्टचे वय 21 वर्ष असून फाजिल पलवामाचा रहीवाशी होता. तर पुलवामाच्या गुदौरच्या जुनेद कादिरचे वय 19 वर्ष होते. या तिघांचाही चकमकीत खात्मा करण्यात आला. जम्मू काश्मीर पोलिसांनी याबाबत ट्विट करून माहिती दिली आहे.
>
> **व्हिडीओ आला समोर** - पंधरा दिवसापूर्वीच काश्मीरच्या पुलवामामध्ये चकमक झाली होती. यात लष्कर-ए-तोयबाच्या एका डिप्युटी कमांडरसह तीन अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला होता.

## 15 जून रोजी विरोधकांची दिल्ली येथे बैठक

# ...तर शरद पवार यांच्या नावाला आमचा पाठिंबा

## राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीवर नाना पटोलेंचे महत्त्वाचे भाष्य

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

राज्यसभेची निवडणूक संपताच आता राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे सर्वांना वेध लागले आहे. या निवडणुकीसाठी सत्ताधारी तसेच विरोधकांनी तयारी सुरु केली आहे. ही निवडणूक भाजपासाठी सोपी जाणार असल्याचे म्हटले जात आहे. मात्र असे असले तरी विरोधकदेखील या निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी शरद पवार यांचे नाव समोर येत असेल तर आमचा त्यांना पाठिंबा राहील, असे



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले आहेत. ते आज पत्रकारांशी बोलत होते. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकासाठी शरद पवार हे संयुक्त पुरोगामी आघाडी आणि महाविकास आघाडीचे उमेदवार असावेत का? असा प्रश्न नाना पटोले यांना विचारण्यात आला. या

> **18 जुलै रोजी मतदान होणार**
>
> दरम्यान, राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची अधिसूचना १५ जून रोजी जारी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २९ जून आहे. ३० जूनपर्यंत अर्जाची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २ जुलै आहे. १८ जुलै रोजी मतदान होणार असून २१ जुलै रोजी निकाल जाहीर केला जाईल.

प्रश्नाचे उत्तर देताना "महाराष्ट्राचा व्यक्ती देशाचा राष्ट्रपती होत असेल आणि शरद पवार यांचे नाव पुढे आले तर महाराष्ट्र काँग्रेस त्यांच्याबरोबर आहे," असे नाना पटोले म्हणाले. दुसरीकडे राष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुकीसाठी विरोधकांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. येत्या १५ जून रोजी विरोधकांची दिल्ली येथे बैठक होणार आहे. या बैठकीसाठी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुढाकार घेतला असून त्यांनी बिगर भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसेच २२ विरोधी पक्षाच्या नेत्यांना बैठकीसाठी आमंत्रित केलं आहे. या बैठकीत निवडणुकीसाठीच्या आगामी रणनीतीवर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रपती पदासाठीच्या

> राष्ट्रपती पदाच्या निवडणुकासाठी शरद पवार हे संयुक्त पुरोगामी आघाडी आणि महाविकास आघाडीचे उमेदवार असावेत का? असा प्रश्न नाना पटोले यांना विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देताना "महाराष्ट्राचा व्यक्ती देशाचा राष्ट्रपती होत असेल आणि शरद पवार यांचे नाव पुढे आले तर महाराष्ट्र काँग्रेस त्यांच्याबरोबर आहे," असे नाना पटोले म्हणाले.

निवडणुकीसाठी विरोधकांकडून कोण उमेदवार असेल यावरदेखील या निवडणुकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## नागालँडमध्ये अतिरेकी समजून कामगारांची हत्या

**। नवी दिल्ली ।** गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये मोन जिल्ह्यातील ओटिंग भागात लष्करी कारवाईत १३ नागरिकांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी नागालँड पोलिसांनी एका अधिकाऱ्यासह २१ पॅरा स्पेशल फोर्सच्या ३० कर्मचाऱ्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. नागालँडचे पोलीस प्रमुख टी जॉन लाँगकुमर यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, आयपीसीच्या कलम १२० (बी), ३०२, ३०७, ३२६, २०१, ३४ अंतर्गत एका मेजरसह २१ पॅरा स्पेशल फोर्सच्या ३० कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हे आरोपपत्र ३० मे रोजी सहाय्यक सरकारी वकील यांच्यामार्फत जिल्हा व सत्र न्यायालयात सादर करण्यात आले. या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे सोपवण्यात आला.

# सेलिब्रिटी फॅशन डिझायनर प्रत्युषाचा संशयास्पद मृत्यू

प्रत्युषाने बाथरुममध्ये कोळसा आणि स्टीम घेतले होते. ज्यामुळे तिचा मृत्यू झाला असावा. या संशयास्पद मृत्यूबाबत पोलिसांनी नोंद करून घेतली आहे. बंजारा हिल्स परिसरातील फिल्म नगर या भागामध्ये प्रत्युषा राहत होती. एएनआयच्या रिपोर्टनुसार, प्रत्युषाच्या



बेडरुममध्ये कार्बन मोनोऑक्साइड मिळालं आहे. तपास सुरु असताना हा संशयास्पद मृत्यू असल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणाबाबत तपास करण्यास सुरुवात केली आहे.

“प्रत्युषाने बंजारा हिल्स स्थित आपल्या अपार्टमेंटमध्ये आत्महत्या केली आहे. प्रत्युषाच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम झाले आहे. याप्रकरणी तक्रारही दाखल करण्यात आली आहे. पोलिसांकडून या प्रकरणी तपास सुरू झाला आहे. प्रत्युषाच्या वडिलांनी तक्रार केली असून त्यांनी कोणावरही आरोप केलेला नाही. प्रत्युषा गेले काही दिवस डिप्रेशनमध्ये होती, त्यामुळे तिच्या मृत्यूमागे कोणाचाही हात नसल्याचं तिच्या वडिलांनी सांगितलं”, अशी माहिती बंजारा हिल्सचे पोलीस अधिकारी नागेश्वर राव यांनी दिली.

# ब्रह्मास्त्र'मधील नंदी अस्त्रधारी नागार्जुनचे पहिले पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला



करण जौहरच्या ‘ब्रह्मास्त्र’ या आगामी बहुचर्चित चित्रपटाची प्रेक्षक गेल्या अनेक दिवसांपासून वाट पाहत आहेत. २०१७ मध्ये घोषित झालेल्या या चित्रपटाची ९ सप्टेंबर रोजी रिलीज होणार असून चित्रपटाते दिग्दर्शक याचित्रपटाबाबत एक एक गोष्ट समोर आणत आहेत ज्यामुळे प्रेक्षक अधिकच उत्सुक झाले आहेत. नुकत्याच मागील ३-४ दिवसांपूर्वी अभिनेते अमिताभ यांचे पहिले पोस्टर शेअर करण्यात आले होते. ज्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता वाढली होती.अशातच आता या चित्रपटातील साउथ सुपरस्टार नागार्जुनचा पहिला लूक शेअर करण्यात आला आहे. त्यामुळे प्रेक्षक अधिकच उत्सुक झाले आहेत. याचं मुख्य कारण म्हणजे नागार्जुन दिर्घ काळानंतर हिंदी चित्रपटामध्ये काम करताना दिसणार आहे.

इंस्टाग्रामवर नागार्जुनचे पहिले पोस्टर रिलीज करण्यात आले आहे. या पोस्टवरून लक्षात येत आहे की चित्रपटात नागार्जुनची जबरदस्त भूमिका पाहायला मिळणार आहे. शिवाय या पोस्टरखाली एक कॅप्शन सुद्धा देण्यात आले आहे. ज्यात लिहिलंय की, “सहस्र नंदी हैं भुजबल जाके

अंधकार भी थर थर कांपे

हाथों में जिसके है हज़ारों नंदियों का बल. जून १५ रोजी ब्रह्मास्त्र ट्रेलरमध्ये १००० नंदीच्या शक्तिसोबत अनीश आणि त्याच्या नंदी-अस्त्रला भेटा. ॐ शिववाहनाय विद्महे तुण्डाय धीमहि, तन्नो नन्दी: प्रचोदयात”

खरंतर ‘ब्रम्हस्त्र’ चित्रपट एक ट्राइलॉजी आहे म्हणजेच हा ३ भागांमध्ये तयार करण्यात येणारा आहे. या चित्रपटाच्या पहिल्या भागाचे नाव शिवा आहे. म्हणजेच या चित्रपटात रणबीर कपूर शिवा ही भूमिका साकारणार असून नागार्जुन नंदी ही भूमिका साकारणार आहे. तसेच आलिया भट्ट ईशा ही भूमिका साकारणार आहे.

# कॉमेडी क्वीन भारतीने मुलाचं नाव काय ठेवलं



कॉमेडी क्वीन भारती सिंह आणि अभिनेता हर्ष लिंबाचिया यांच्या मुलाच्या नावासाठी त्यांचे अनेक चाहते प्रतिक्षेत होते. भारती तिच्या मुलाला लाडाने गोला असं म्हणते. पण त्याचं खरं नाव काय असेल याकडे तिचे चाहते लक्ष ठेवून होते. दरम्यान, भारतीने आता तिच्या मुलाचं नाव जाहीर केलं आहे. (भारती आणि हर्ष लिंबाचिया यांनी आपल्या मुलाचं नाव लक्ष्य असं ठेवलं आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार भारतीने सहज बोलता बोलता तिच्या मुलाचं नाव सांगितलं.

एका व्हिडिओमध्ये ती म्हणते की, ‘आमच्या मुलाला त्याच्या आई-वडिलांनी काम करताना पाहण्याची सवय आहे. लक्ष्य जन्माआधीपासून काम करत आहे.’

भारतीच्या या वक्तव्यावरून तिने तिच्या मुलाचं नाव लक्ष्य ठेवलं असल्याचं समोर आलं आहे.

दोन महिन्यांनंतरही भारतीने आपल्या मुलाचा चेहरा समाजमाध्यमांवर दाखवलेला नाही. पण मुलाशी संबंधित छोट्या छोट्या गोष्टी हे कपल व्लॉग्सच्या माध्यमातून शेअर करत असतात. लाइफ ऑफ लिम्बाचियाज नावाच्या युट्यूब चॅनेलवरून हे व्हिडिओ प्रसिद्ध होत असतात. दरम्यान, भारती आणि हर्ष आपल्या मुलाला फर्स्ट ट्रिपसाठी गोव्याला घेऊन गेले होते.

# आयुष्मान खुरानाच्या ‘ड्रीम गर्ल 2’ मध्ये सारा अली खान मुख्य भूमिकेत?



'अनेक' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर आता आयुष्मान येत्या काळात 'ड्रीम गर्ल' चित्रपटाच्या दुसऱ्या सिक्वेलमध्ये दिसणार आहे. या चित्रपटाचे निर्माते या 'ड्रीम गर्ल'च्या दुसऱ्या सिक्वेलची तयारी करत आहेत बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुरानाला हिंदी चित्रुपटसृष्टीतील टॅलेंटेड कलाकरांपैकी एक समजले जाते. गेल्या काही दिवसांपूर्वी आयुष्मानचा ‘अनेक’ चित्रपट प्रदर्शित झाला होता. मात्र या चित्रपटाला प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. ‘अनेक’ चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर आता आयुष्मान येत्या काळात ‘ड्रीम गर्ल’ चित्रपटाच्या दुसऱ्या सिक्वेलमध्ये दिसणार आहे. या चित्रपटाचे निर्माते या ‘ड्रीम गर्ल’च्या दुसऱ्या सिक्वेलची तयारी करत आहेत, ‘ड्रीम गर्ल 2’ चित्रपटामध्ये सुद्धा आयुष्मान खुरानाच मुख्य भूमिका साकरणार असून या आधीच्या पहिल्या सिक्वेलमध्ये सुद्धा आयुष्मानने काम केले होते. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून या चित्रपटाचे निर्माते आयुष्मान सोबत मुख्य भूमिकेसाठी अभिनेत्रीच्या शोधात होते.



याआधीच्या ‘ड्रीम गर्ल’ चित्रपटाध्ये आयुष्मान खुराना सोबत नुसरत भरूचे दिसली होती.

सारा अली खानचे नाव चर्चेत सूत्रांच्या माहितीनुसार, राज शांडिल्य यांच्या दिग्दर्शनात तयार होणाऱ्या ‘ड्रीम गर्ल 2’ चित्रपटासाठी नेमलेल्या काही अभिनेत्रींची नावं समोर आली आहेत, यात अभिनेत्री सारा अली खानचे नाव टॉप चॉइसमध्ये आहे. ‘

## शॉर्ट न्यूज »

### आर्चरीमध्ये साताऱ्याच्या आदितीची सुवर्ण कामगिरी



। नवी दिल्ली । महाईन्यूज

खेलो इंडिया युथ गेम्स आर्चरी स्पर्धेमध्ये साताऱ्याच्या आदिती स्वामीने ( सुवर्ण कामगिरी केली आहे. तर अहमदनगरच्या पार्थ कोरडेने रौप्यपदक पटकावले आहे. पंजाब युनिर्व्हिसिटीच्या मैदानावर झालेल्या आर्चरीमध्ये साताऱ्याच्या आदिती स्वामीने सुवर्णवेध घेतला आहे. कम्पाउंड राऊंडमध्ये आदितीने हे यश मिळवले आहे. आदितीने केलेल्या या सुवर्ण कामगिरीमुळे महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळाले आहे. पार्थ कोरडेचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले असून त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले आहे.आदितीने पंजाबच्या अवनित कौरचा पराभव केला आहे. आदितीचा स्कोर १४४ होता तर अवनित कौरने १३७ गुण मिळवले होते. अहमदनगरच्या पार्थने दुसरे पदक पटकावले आहे. पार्थ आणि आंध्र प्रदेशच्या व्यंकीसोबत अंतिम सामना झाला होता. मात्र, या सामन्यात पार्थने खराब सुरूवात केली होती.

# कर्णधार शनाकाने अखेरच्या षटकात श्रीलंकेला जिंकवले!

## ऑस्ट्रेलियाला दोन सामने जिंकून मालिका आपल्या खिशात घातली

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन सामन्यांच्या T20 मालिकेतील शेवटचा सामना श्रीलंकेने चार गडी राखून जिंकला. पहिले दोन सामने गमावून मालिका आधीच गमावलेल्या श्रीलंकेचा संघ सन्मान वाचवण्यासाठी हा सामना खेळत होता. यासाठी ऑस्ट्रेलियाला दोन सामने जिंकून मालिका आपल्या खिशात घातली होती.स्मिथ आणि स्टॉइनिस यांनी ऑस्ट्रेलियाला चांगल्या धावसंख्येपर्यंत नेले. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत फिंच आणि वॉर्नर या जोडीने ऑस्ट्रेलियन संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी 43 धावा जोडल्या. फिंचने 29 आणि वॉर्नरने 39 धावा केल्या. यानंतर स्टीव्ह स्मिथच्या नाबाद 37 आणि मार्कस स्टॉइनिसच्या 38 धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाची धावसंख्या 176 पर्यंत पोहोचली. श्रीलंकेकडून महिष तिक्षाने दोन, वनिंदू हसरंगा आणि जयविक्रिमाने प्रत्येकी एक गडी बाद केला. करुणारत्नेला विकेट मिळाली नाही, पण त्याने चपखल गोलंदाजी केली.177 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या संघाची सुरुवात काही खास झाली नाही. 25 धावांवर पहिली विकेट पडली. दानुष्का गुणातिलका 15 धावा करून बाद झाला. पथुम निशांकाने 27 आणि चरित असलंकाने 26 धावा केल्या. शेवटी कर्णधार दासून शनाकाने नाबाद 54 आणि चमिका करुणारत्नेने 14 धावा करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. ऑस्ट्रेलियाकडून मार्कस स्टॉइनिस आणि जोस हेझलवूडने प्रत्येकी दोन गडी बाद केले.



▶▶ ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना 176 धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेने एक चेंडू राखून १७७ धावा करत सामना जिंकला. श्रीलंकेचा कर्णधार दासून शनाकाने करिष्माई खेळी खेळून आपल्या संघाला जिंकून दिले. सध्या श्रीलंकेची अर्थव्यवस्था डबघाईला आली असून हा देश आर्थिक संकटातून जात आहे. कठीण परिस्थितीत देशातील जनतेमध्ये निराशेचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत श्रीलंकेच्या संघाने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून आपल्या चाहत्यांना आनंद साजरा करण्याची संधी दिली. श्रीलंकेच्या विजयानंतर चाहते भावूक झाले आणि त्यांनी बराच वेळ विजय साजरा केला.

# अफगाणिस्तानच्या फूटबॉलपटू कडून भारतीय खेळाडूंना मारहाण

## अफगाणिस्तानच्या खेळाडूंनी भारतीय खेळाडूंशी गैरवर्तन



। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भारत आणि अफगाणिस्तानच्या खेळाडूंचे संबंध क्रिकेटमध्ये चांगले आहेत. पण फुटबॉलमध्ये तसं दिसत नाहीये. काल शनिवारी रात्री खेळण्यात आलेल्या AFC एशिया कप क्वॉलिफायर्स-२०२३ मध्ये टीम इंडियाने अफगाणिस्तानचा २-१ ने पराभव केला. या पराभवामुळे निराश झालेल्या अफगाणिस्तानच्या खेळाडूंनी भारतीय खेळाडूंशी गैरवर्तन केले. याचा व्हिडिओ सुद्धा सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये अफगाणिस्तानचे खेळाडू दोन भारतीय खेळाडूंसोबत भांडताना दिसत आहेत. काही वेळाने संपूर्ण अफगाण संघ येतो आणि त्यांच्यासोबत धक्काबुक्की करण्याचा प्रयत्न करतो. टीम इंडियाचा गोलकीपर गुरप्रीत सिंग दोन्ही संघांना शांत करण्याचा प्रयत्न करतो, पण त्यालाही अफगाणिस्तानच्या खेळाडूंकडून धक्काबुक्की करण्यात येते. यानंतर टीम इंडियाचे खेळाडू आपल्या सहकारी खेळाडूंना वाचवण्यासाठी गेले, मात्र हाणामारी थांबली नाही. मारहाण का झाली हे अद्याप समजू शकलेले नाही. तसेच दोन्ही संघांनी या कारणाबाबत अद्यापही कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल केलेली नाही. टीम इंडियाचा कर्णधार सुनील छेत्रीने सामन्यात अप्रतिम गोल केला. त्याने ८५व्या मिनिटाला फ्री-किकवर गोल मारुन टीम इंडियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली, पण अफगाणिस्तानने ८८ मिनिटाला झुबेर अमीरीने फ्री-किकवर गोल करत सामना बरोबरीत आणला. त्यामुळे टीम इंडियाला मिळालेल्या या विजयासह भारतीय संघ स्पर्धेच्या ग्रुप-डीमध्ये दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही